**नि.दि.दावा क्र.८७/२०२०**
(CNR : MHNS200011282020)
*मिराबाई घोडेकर वि. एकनाथ घोडेकर व इतर*

# निशाणी क्र. १९ खालील आदेश

*(पारीत दि.०८/०३/२०२१)*

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्ती होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**२.** अर्ज व जबाब वाचला. प्रकरणाचे अवलोकन केले. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. एस. लहामगे व प्रतिवादींतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. पी. आव्हाड यांनी केलेला युक्तिवाद ऐकला.

**३.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुतचा दावा वादीने वाटप, ताबा व कायम मनाई हुकूम होवुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाद्वारे वादी दाव्यामध्ये मनेगांव येथील गट नंबर ४४० व २९२ या मिळकतींचा तसेच जादा प्रतिवादी क्र.१० चा समावेश करु इच्छीत आहे. दावा वाटपाकरीता असल्याने आवश्यक पक्षकार व कॉमन हॉटस्पॉट या तत्वांचा विचार केला असता प्रस्तुत अर्ज वादाचे स्वरुप विचारात घेता मंजूर करने योग्य व न्यायोचीत आहे. दावा प्राथमिक स्थितीत असल्याने उभयपक्षकारांच्या अधिकारांवर कोणताही विपरीत परिणाम होणारा नाही. गट नं. ४४० व २९२ च्या ७/१२ उता-यांचे (यादी दिनांक २२/०९/२०२० वरील अ.क्र.३ सोबत असणारे ७/१२ उतारे) अवलोकन केले असता त्यामध्ये प्रस्तावित प्रतिवादी क्र.१० गोपाळ लक्ष्मण घोडेकर याचे नाव नमूद असल्याचे दिसुन येते. तसेच इतर सह धारक सुध्दा या दाव्यामध्ये प्रतिवादी म्हणुन समाविष्ट आहेत. सबब, सदरची परिस्थिती व दाव्याची प्राथमिक स्थिती विचारात घेता अर्ज मंजूर करणे मला योग्य व न्यायोचीत वाटल्याने मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :-

**-: <u>आदेश</u> :-**

१. अर्ज (निशाणी क्र.१९) मंजुर करण्यात येत आहे.

२. उपरोक्त आदेशाची पुर्तता करुन तशी दुरुस्त दाव्याची प्रत वादीने सादर करावी.

३. खर्चाबाबत आदेश अंतीम सुनावणीच्या वेळी करण्यात येईल.

सही/-

**( डी. एस. जाधव )**
सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
सिन्नर न्यायालय, सिन्नर

ठिकाण :- सिन्नर.
दिनांक :- ०८/०३/२०२१.